# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## सोमवार, दिनांक १५ एप्रिल, २०१३.
## (सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत)

**(अ) लक्षवेधी सूचना - (म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

**(१) (गुरुवार, दिनांक २१ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना ) -**

**डॉ. रणजित पाटील,** सर्वश्री. नागो गाणार, दिपकराव साळुंखे, संदिप बाजोरिया, हेमंत टकले, जयवंतराव जाधव, विक्रम काळे, अनिल भोसले, सतीश चव्हाण **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

" राज्यातील १ हजार ३९ गोदामांपैकी १८४ गोदामे निकृष्ट दर्जाची आढळून येणे, ७५ लाख मेट्रीक टन धान्याच्या साठवणुकीचा प्रश्न राज्याच्या अन्न पुरवठा विभागासमोर निर्माण होणे, लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या धान्याच्या साठवणीबाबत राज्य शासन फारसे गंभीर नसणे, परिणामी साठवलेले धान्य दरवर्षी खाण्याच्या स्थितीत राहत नसल्याचे आर्थिक पाहणी अहवालात स्पष्ट होणे, कुजलेल्या अवस्थेमधील हे धान्य शिधापत्रिकाधारकांना वितरीत केले जाणे, त्याच बरोबर राज्यात ५ कोटी ६८ लाख मेट्रीक टन धान्य साठवण्यासाठी पुरेशी गोदामेच नसल्याने भाड्यापोटी वर्षाकाठी २८० कोटी ६८ लाख रुपयाचा महसुल खर्च व्यर्थ जाणे, तसेच पावसाळ्यात गोदामाच्या गळतीमुळे धान्याची नासाडी होणे, प्रतिकुल परिस्थितीत टिकून राहण्यासाठी दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च केले जात असणे, निकृष्ट गोदामाचा यादीमध्ये राज्यातील २१ जिल्हे असून विदर्भातील गोदाम संख्या सर्वाधिक असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

**(२) (मंगळवार, दिनांक २ एप्रिल, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना ) -**

**श्री. पांडुरंग फुंडकर वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शेगाव (जि.बुलढाणा) येथील मौजे जानोरी या गावातील नळयोजना

जलस्वराज्य प्रकल्पातून ग्रामीण पाणीपुरवठा समितीने बांधून पूर्ण केल्यानंतर या समितीने २२ महिने सक्षमपणे गावास पाणी पुरवठा करणे, दिनांक ७ जून, २०१० रोजी बुलढाणा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार समितीने ही योजना जानोरी ग्रामपंचायतीस हस्तांतरीत केल्यानंतर या योजनेतून होणारा पाणीपुरवठा बंद होणे, परिणामी गावातील नागरिकांना नजीकच्या टाकळीधारव, तिवान या गावांवरुन पाणी आणावे लागणे, या योजनेतून पाणी पुरवठा पुर्ववत सुरु होण्यासाठी दिनांक १६ फेब्रुवारी, २०१३ रोजी बुलढाणा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीत स्थानिक लोकप्रतिनिधींनी ही नळपाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत सूचना करुनही आजतागायत ही योजना सुरु न होणे, परिणामी नागरिकांना भीषण पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत असणे, त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष, या प्रकरणी शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका."

**(३) (गुरुवार, दिनांक ४ एप्रिल, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना ) -**

**श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मिरा-भाईंदर शहराची आजमितीस लोकसंख्या १५ लाखांवर असताना स्टेम प्राधिकरणाकडून ८६ एम.एल.डी. आणि एम.आय.डी.सी. कडून ३० एम.एल.डी. अशा एकंदर ११६ एम.एल.डी. पैकी गळती वजा करता प्रत्यक्षात केवळ १०० एम.एल.डी. म्हणजेच जेमतेम १० लाख लोकसंख्येला पुरेल इतकाच होत असलेला पाणीपुरवठा, प्रत्यक्षात २२५ एम.एल.डी. पाण्याची असलेली आवश्यकता, तब्बल ४० ते ४२ तासानंतर १ तासच पाणीपुरवठा होणे, नवी मुंबई महानगरपालिकेने त्यांच्याकडील मोरबे धरणातील अतिरिक्त शिल्लक पाण्यामधून दिनांक ९ जून, २००५ रोजीच्या पत्रान्वये १०० एम.एल.डी. पाणी देण्याचे मान्य करुनही ते अद्याप मिरा-भाईंदर महानगरपालिकेला न मिळणे, शहरामध्ये निरनिराळ्या एम.एम.आर.डी.ए., म्हाडा व इतर गृहनिर्माण योजना लागू होण्यामुळे कमीत कमी ५ लाख लोकसंख्येची भर पडणे, १२५ कोटी रुपये कर्ज असणारी मिरा-भाईंदर महानगरपालिका एवढ्या प्रमाणात वाढणाऱ्या लोकसंख्येला पाणीपुरवठा करण्यास असमर्थ असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कारवाई व

प्रतिक्रिया."

**(मंगळवार, दिनांक ९ एप्रिल, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना - अनुक्रमांक ४ ते ७ ) -**

(४) **सर्वश्री. विनोद तावडे,** चंद्रकांत पाटील, ॲड. आशिष शेलार, श्री.रामनाथ मोते **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"भिवंडी तालुका व आजुबाजुच्या परिसरात अनधिकृत गोदामांच्या संख्येत दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात होत असलेली वाढ, आजमितीस सुमारे २ हजार अनधिकृत गोदामे या ठिकाणी कार्यरत असणे, शासनाची कोणतीही परवानगी न घेता विविध प्रकारच्या वस्तुंची व घातक रसायनांची साठवणूक त्यात करण्यात येत असणे, यामुळे अनेकदा सदरहू गोदामांना आग लागून झालेली जीवीत व वित्तहानी, कारवाई करण्यास एमएमआरडीए, पोलीस व महसूल विभागाचे अधिकारी स्वत:ची जबाबदारी नाकारुन एकमेकांवर आरोप करीत असणे, ही अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत अद्यापी कोणतीच कारवाई करण्यात आलेली नसणे, गोदाम मालक भाड्यापोटी लाखो रुपये मिळवित असताना शासनास मात्र कोणताही महसूल मिळत नसणे, या गोदाम मालकांकडून भाड्याच्या रकमेपैंकी ५० टक्के उत्पन्न शासनाने अनर्जित उत्पन्न म्हणून जमा केल्यास शासनाचे उत्पन्न दरवर्षी १२० कोटी रुपयांनी वाढण्याची शक्यता,शासनाची याबाबत तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रीया."

(५) **डॉ. नीलम गोऱ्हे,** डॉ. अपूर्व हिरे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यातील स्कूल बसचा प्रश्न गंभीर असून मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद आदि शहरी भागात होत असलेले स्कूल बस अपघात, यात निष्पाप बालकांचा होत असलेला मृत्यू, तसेच माहे जानेवारी, २०१३ च्या सुमारास मुंबईतील जुहू येथे तीन वर्षाच्या मुलींवर शाळेच्या बसमध्ये झालेल्या लैंगिक अत्याचाराची घटना, राज्य शासनाने या शालेय बसगाड्याकरिता केलेल्या नियमावलींच्या विरोधात "स्कूल बस ओनर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र" या संघटनेने उच्च न्यायालयात दावा दाखल करणे, न्यायालयाने शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षा अत्यंत महत्वाची असून त्यात कुठलीही तडजोड करता येणार नाही, असे नमूद करुन सुधारित नियमावलीत स्थगिती देण्यास नकार देणे, तथापि, प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याने या नियमावलीची प्रभावी

अंमलबजावणी होत नसणे, शिक्षण हक्क कायद्यानुसार एक किलोमीटरच्या अंतरामध्ये राहणाऱ्या मुलांना प्रवेश देताना प्राधान्य देणे आवश्यक असतांना शाळा चालकांनी दूरवर राहणाऱ्या मुलांना प्रवेश देणे, या विद्यार्थ्यांना बससेवेची गरज भासणे, प्रवासाचा कालावधी जास्त असल्यानेही मुलांवरील लैंगिक अत्याचारासारखे प्रकार घडत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व प्रतिकिया."

(६) **श्री. संदिप बाजोरिया वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व यवतमाळच्या वसंतराव नाईक शासकीय महाविद्यालयामध्ये लॅप्रोस्कोपी मशीन खरेदीसाठी शिक्षण व संशोधन संचालनालयाकडे पाठविलेल्या प्रस्तावावर निर्णय घेण्याची कार्यवाही सदोषपणे सुरु असल्याने मंजूर झालेला निधी व्यपगत (लॅप्स) होणार असणे, परिणामी, परिसरातील गोरगरीब नागरीक आधुनिक उपचारांना वंचित राहणार असणे, सदर महाविद्यालयांमध्ये लॅप्रोस्कोपी यंत्रणा कार्यान्वित होण्यासाठी शासनाने त्वरीत हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **सर्वश्री अमरसिंह पंडित,** सतीश चव्हाण **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **विशेष सहाय्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यात श्वेतकुष्ठ (कोड) या आजाराचे प्रमाण लोकसंख्येच्या ४ ते ८ टक्क्यांपर्यंत असणे, श्वेतकुष्ठ रुग्णांमध्ये महिला रुग्णांचे प्रमाण ६७ टक्के इतके असणे, हा रोग ५५ टक्के रुग्णांना वय वर्षे १० ते २० वयोगटात होणे, श्वेतकुष्ठ रुग्णास मधुमेह, उच्च रक्तदाब, केस गळणे, कर्ण बधीरता, मानसिक आजारांसारख्या रोगांची लागण होणे, राज्यात १४ लक्ष महिला आणि ८ लक्ष मुली या आजाराने त्रस्त असल्याचे एका खाजगी संस्थेच्या सर्व्हेक्षणात उघड होणे, महिला आणि पुरुष असे सुमारे ५० लाखांहून अधिक रुग्ण या आजाराने पिडीत असणे, रोगाविषयीच्या गैरसमजामुळे समाजाने या रुग्णांना बहिष्कृत करण्याचे प्रकार घडणे, श्वेतकुष्ठ रुग्णांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सामाजिक, आर्थिक मदत शासन स्तरावरुन करण्याची आवश्यकता, या रुग्णांसाठी संजय गांधी किंवा श्रावणबाळ निराधार योजनांचा लाभ या रुग्णांना देण्यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**(बुधवार, दिनांक १० एप्रिल, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना - अनुक्रमांक ८ ते ११) -**

(८) **प्रा. सुरेश नवले,** सर्वश्री. संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, चरणसिंग सप्रा, सुभाष चव्हाण, डॉ.सुधीर तांबे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"औरंगाबाद शहराच्या स्थापनेपासून चारशे वर्षापूर्वीचा ऐतिहासिक वारसा असलेल्या "नहरे अंबरी" या पाणीपुरवठा व्यवस्थेकडे महापालिका व प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याने सदरहू ऐतिहासिक पाणी ठेवा नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, सद्य:स्थितीत पैठणच्या जायकवाडी जलाशयातून शहराला पाणीपुरवठा होत असला तरी, धरणातील अपुरा पाणीसाठा व दुष्काळी स्थितीमुळे तीन दिवसाआड पाणीपुरवठा होत असणे, काही वीटभट्टी मालक "नहरे अंबरी" पाणीपुरवठा व्यवस्था फोडून त्यातील पाण्याचा वापर करीत असणे, संबंधित प्रशासन या गैरवापरास अटकाव करीत नसल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिडीची व असंतोषाची भावना, शासनाने या प्रकरणी त्वरीत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(९) **श्रीमती विद्या चव्हाण वि.प.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"धुळे जिल्ह्यातील नगावबारी येथे बेबीबाई चौधरी व तिचा मुलगा गणेश चौधरी यांनी गरीब असहाय्य अल्पवयीन मुलींना गुंगीचे औषध देऊन त्यांना जबरदस्ती वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडण्याचे नुकतेच उघडकीस येणे, मुलींनी विरोध केला तर त्या मुलींना जबर मारहाण करण्यात येणे, त्यांच्या अंगावर साप व कुत्री सोडण्यात येणे, बेबीबाई चौधरी ही तिच्या हस्तकांद्वारे नाशिक, शिरपूर, धुळे, जळगांव येथून अल्पवयीन मुलींना पळवून आणत असणे, तेथील पोलीसांच्या संगनमताने हा व्यवसाय सुरु असल्याची व्यक्त होत असलेली शंका, आरोपीवर अद्यापही कारवाई न होणे, त्यामुळे तेथील नागरिकांत पसरलेला तीव्र संताप, बेबीबाई चौधरी, तिचा मुलगा व इतर हस्तक यांच्याविरुध्द शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

(१०) **सर्वश्री. रामनाथ मोते,** विनोद तावडे, भगवान साळुंखे, नागो गाणार **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अन्वये,

इ. १ ली ते इ.८ वीच्या प्राथमिक शिक्षकांकरीता शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता वाढविण्याबाबत व शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य करण्याबाबत शासनाने दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ च्या शासन निर्णयानुसार धोरणात्मक निर्णय घेणे, त्यानुसार इ.६ वी ते इ.८ वीसाठी किमान शैक्षणिक पात्रता पदवी व शिक्षणशास्त्र पदविका अशी वाढ करणे, सेवेत असलेल्या शिक्षकांसाठी दिनांक ३१ मार्च, २०१५ पर्यंत शैक्षणिक पात्रता वाढविण्यास मुदत देणे, सेवेत असलेल्या शिक्षकांनासुध्दा पात्रता परीक्षा देण्याची तरतूद करणे, दिनांक ६ मार्च, २०१३ च्या निर्णयानुसार सेवेत असलेल्या शिक्षकांसाठी पात्रता परीक्षा पास होण्याचे (टी.ई.टी.) बंधन रद्द करणे, सध्या प्राथमिक शाळांमध्ये एस.एस.सी./एच.एस.सी. व शिक्षणशास्त्र पदविकाधारक हजारो शिक्षक सेवेत असून तत्कालीन प्रचलित नियमानुसार त्यांच्या नियुक्त्या असूनही १ वर्षापासून ३१ वर्ष सेवा केलेल्या शिक्षकांना पदवी प्राप्त करण्याचे टाकलेले बंधन नियमबाह्य असणे, वाढीव शैक्षणिक पात्रतेचा नियम पूर्वलक्षी प्रभावाने लागू करणे हे नैसर्गिक न्याय तत्वाविरुध्द असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(११) **सर्वश्री. मितेश भांगडिया,** नागो गाणार, विनोद तावडे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **पर्यावरण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"विदर्भातील तालुका व जिल्हा वर्धा येथील शेकडो एकर क्षेत्रात असलेल्या लॅन्को थर्मल पॉवर प्रकल्पाला २८५८ घनमीटर पाणी प्रती तास आवश्यक असताना विदर्भ जलसिंचन विकास मंडळाने ४६०० घनमीटर पाणी प्रती तास इतक्या मोठया प्रमाणावर दिलेली परवानगी, यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना शेतीकरीता पाण्याची कमतरता भासणे, तसेच स्थानिक नागरीकांना पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उभा राहणे, या प्रकल्पाच्या जागेपासुन १० किलो मीटर परीसरामध्ये १३ आरक्षित वनांचा समावेश असून प्रकल्प पुर्णावस्थेत सुरु झाल्यास होणाऱ्या प्रदुषणामुळे संरक्षित वने व परिसरातील सर्व शेतातील पिकांना प्रदुषित राखेच्या उर्त्सजनामुळे धोका संभवणे, प्रदुषण नियंत्रण मंडळाने घातलेल्या अटीनुसार या प्रकल्पामार्फत हरीत पट्टयाची अजुनही लागवड न होणे, प्रकल्पातुन उत्सर्जनामुळे निघणाऱ्या राखेमुळे सामान्य नागरीकांच्या आरोग्याला हानी पोचणे, नागरीकांना श्वसनक्रीयेचा त्रास सुरु होणे, प्रकल्प क्षेत्रालगत ४ छोटी धरणे असून त्या सर्व धरणातील पेय जल प्रदुषित होण्याचा धोका, यामुळे सामान्य जनतेमध्ये निर्माण झालेले भितीचे वातावरण, या प्रदुषण समस्येवर तातडीने नियंत्रण

करण्याची तसेच जास्तीत जास्त स्थानिकांना या प्रकल्पात रोजगार उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, यावर शासनाने त्वरीत करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

(१२) **सर्वश्री. धनंजय मुंडे,** विनायकराव मेटे, अमरसिंह पंडित **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्य मार्ग परिवहन महामंडळात २७ हजार कर्मचारी कनिष्ठ वेतन श्रेणीवर कार्यरत असून उच्च न्यायालयाने दिनांक ३१ जानेवारी, २०१३ पुर्वी या कर्मचाऱ्यांची कनिष्ठ वेतनश्रेणी रद्द करण्याचा निर्णय देण्यात येणे, किमान वेतन कायद्यापेक्षा ही कमी वेतनावर हे कर्मचारी काम करीत असणे, अद्यापही कनिष्ठ वेतन श्रेणी रद्द करण्यात आलेली नसणे, कनिष्ठ वेतनश्रेणीद्वारे मागील १९ वर्षापासून कर्मचाऱ्यांचे होत असलेले आर्थिक शोषण, या स्थितीमध्ये कर्मचाऱ्यांनी महामंडळाला रुपये ३० कोटीने नफ्यात आणून दिलेले असणे, शासनाने तातडीने कनिष्ठ वेतनश्रेणी रद्द करुन कायम वेतन श्रेणी लागू करुन कर्मचाऱ्यांच्या रास्त मागणीचा सहानुभुतीपूर्वक विचार करण्याची नितांत गरज, यासर्व बाबींसंदर्भात शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१३) **ॲड. अनिल परब वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"टाटा पॉवरने मुंबईच्या उपनगरात सर्वत्र मुख्यत: पश्चिम द्रुतगती महामार्ग तसेच दहिसर ते वांद्रे व मानखुर्द ते चेंबूर भागात आपले नेटवर्क उभारुन मुख्यत: ३०० युनिटपेक्षा कमी वीज वापर करणाऱ्या गरीब वीजग्राहकांना वीजपुरवठा करण्याच्या देण्यात आलेल्या आदेशाची माहिती अद्यापही प्रसिध्द करुन लहान वीज ग्राहकांपर्यंत पोहोचवली नसणे, तसेच टाटा पॉवरच्या ट्रॉम्बे येथील वीज निर्मिती केंद्रामुळे संपूर्ण पूर्व उपनगरात मोठ्या प्रमाणात वाढलेले प्रदूषण, तुर्भे, अणुशक्तीनगर व गोंवडी या भागात नागरिकांना दमा व कर्करोगाचे वाढलेले प्रमाण, त्यातच टाटा पॉवरला लहान वीज ग्राहकांना वीज पुरवठा करण्याचे बंधन घातल्यानंतर त्यांनी ट्रॉम्बे वीज प्रकल्पातील युनिट क्र.६ चे रुपांतर तेलावरुन कोळश्यावर करण्याची मागितलेली परवानगी, यामुळे दररोज ७००० मेट्रीक टन अतिरिक्त कोळसा जाळला जाणार असून यापासून होणाऱ्या प्रदूषणामुळे मुंबईकरांना अनेक रोगांची लागण होण्याची निर्माण झालेली शक्यता, परिणामी त्यांच्यात निर्माण झालेली चिंतेचे व घबराटीचे वातावरण, याबाबत शासनाने

तातडीने केलेली व करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(१४) **श्री. चरणसिंग सप्रा वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"जिल्हा नांदेड येथील गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब येथे दिनांक ३० ऑक्टोबर, २००८ रोजी शीख समाजाचे पवित्र श्री गुरु ग्रंथ साहिब यांना ३०० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त गुरुत्ता गद्दी त्रिशताब्दी महोत्सव फार मोठा उत्साहात साजरा करण्यात येणे, गुरुत्ता गद्दी कार्यक्रमास आणि गुरुद्वारा दर्शनास देश, विदेशातून आलेल्या लाखो भाविकांना पायाभूत सुविधा मिळाव्या यासाठी आणि गुरुद्वारा परिसरातील विकास कामे करण्यासाठी जवळजवळ १८०० कोटी रुपये खर्च करण्यात येणे, त्यात राज्य शासनाच्या वित्त व नियोजन विभागाने रुपये ६१ कोटी बिनव्याजी उसने रुपाने दिले असणे, परंतू गुरुद्वारा बोर्डास एवढ्या मोठ्या रक्कमेची परतफेड करणे शक्य नसणे, सदर रुपये ६१ कोटी इतकी रक्कम अनुदानात रुपांतरीत करण्यात यावी, अशी गुरुद्वारा बोर्डाने शासनाकडे वारंवार विनंती केलेली असणे, तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी यास सहमती दर्शवून सदर रक्कम अनुदानात रुपांतरीत करण्यात येईल असे आश्वासन देणे, परंतू शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे शीख समाजात नैराश्याचे वातावरण निर्माण होणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

(१५) **श्री. जयंत पाटील,** डॉ. रणजीत पाटील, श्री. नागो गाणार **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **जलसंपदा (कृष्णा खोरे-पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"अकोला जिल्ह्यातील जवळजवळ ४० ते ५० टक्के क्षेत्र खारपाणपट्टामध्ये (क्षारपड) येत असल्याने या भागातील जमीन खोल काळ्या मातीची असणे, परिणामी गोडेपाणी लागत नसल्यामुळे सिंचन व पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, यावर उपाययोजना म्हणून महाराष्ट्र शासनाने खारपाणपट्टामध्ये काही सिंचन प्रकल्प मंजूर करणे, एकूण ९ सिंचन प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण झाल्यास पावसाचे गोडे पाणी साठवणे शक्य असणे, मात्र, खारपाणपट्टयामध्ये बांधकामासाठी लागणारा काळा दगड, मुरुम इत्यादी जवळपास उपलब्ध नसणे, यामुळे खारपाणपट्टयामध्ये प्रकल्प बांधणे महागडे होत असून ते शासनाच्या प्रचलित मापदंडामध्ये न बसणे, माहे नोव्हेंबर,

२०११ पासून या प्रकल्पाचे काम जवळजवळ बंद असणे, या प्रकल्पाची अंदाजित किंमत रुपये ६४० कोटी एवढी असून यास केंद्रीय जल आयोग, दिल्ली व नियोजन आयोगाकडून "इन्व्हेस्टमेंट क्लिअरन्स" बाबतची मान्यता मिळालेली असणे, या सर्व बाबी विचारात घेता शासनाने तातडीने केलेली कारवाई व उपाययोजना."

**(ब) म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदन - (असल्यास).**

## (दुपारी १२.१५ वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(अ) तारांकित प्रश्न.**

**(ब) तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**कृषी मंत्री** : "परभणी येथील मराठवाडा कृषी विद्यापीठाने बांधकाम विभागात केलेला गैरव्यवहार" या विषयावरील श्री.सतीश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.एम.एम.शेख, श्री.हेमंत टकले, श्री.रमेश शेंडगे, डॉ.सुधीर तांबे, वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ३३४३७ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१२ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती, सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे -**

**(१) उद्योग मंत्री** : **(अ)** "पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा एक्केचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ब)** "कोंकण विकास महामंडळ मर्यादितचा सन २००४-२००५ या वर्षाचा चौतीसावा वार्षिक अहवाल व लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) सामाजिक न्याय मंत्री** : "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २००४-२००५ व २००५-२००६ या वर्षाचा अनुक्रमे वीसावा व एकवीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(३) **कृषी मंत्री** : "महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांचा सन २००९-२०१० या वर्षाचा चव्वेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(४) **महसूल मंत्री** : "महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २००९-२०१० या वर्षाचा सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(५) **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : **(अ)** "शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २००९-२०१० व २०१०-२०११ या वर्षांचा अनुक्रमे सत्तेचाळीसावा व अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ब)** "शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(क)** "पुणे विद्यापीठ, पुणे यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा वार्षिक लेखे संविधानिक लेखा परीक्षकांचा लेखापरिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ड)** "सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक लेखापरिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(इ)** "गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक लेखे अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(६) **कामगार मंत्री** : **(अ)** "नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नाशिक यांचा सन २०१०-२०११ व २०११-२०१२ या वर्षांचा अनुक्रमे सव्वीसावा व सत्तावीसावा लेखापरिक्षण अहवालासह वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ब)** "नाशिक जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ (लासलगांव) यांचा सन २००९-२०१० व २०१०-२०११ या वर्षांचा अनुक्रमे एकवीसावा व बावीसावा

वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(क) "दि रेल्वे गुडस् क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेंटस लेबर बोर्ड मुंबई यांचा सन २००९-२०१० व २०१०-२०११ या वर्षांचा अनुक्रमे तेहेतीसावा व चौतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(ड) "किराणा बाजार व दुकाने मंडळ (बृहन्मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांकरिता) यांचा सन २००९-२०१० व २०१०-२०११ या वर्षांचा अनुक्रमे चाळीसावा व एकेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(इ) "कोल्हापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, कोल्हापूर यांचा सन २००८-२००९ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(ई) "जालना जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जालना यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा तेवीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(फ) "इचलकरंजी माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, इचलकरंजी यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा अठरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक, २०११ च्या संबंधात मा.राज्यपाल यांच्याकडून आलेला संदेश.**

**चार : लोकलेखा समितीचा अकरावा अहवाल सादर करणे.**

**पाच : रोजगार हमी योजना समितीचा बाविसावा, तेविसावा व चोविसावा अहवाल सादर करणे.**

**सहा : विधानपरिषद सदस्य अनुपस्थिती समितीचा दुसरा अहवाल (२०१२-२०१३) सादर करणे व त्यावर विचार करणे.**

**सात : वि.स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचा दुसरा अहवाल (२०१२-२०१३) सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**आठ : लक्षवेधी सूचनेसंदर्भातील अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**गृहमंत्री** : "मौजे केट्टापाट (ता.कळमेश्वर, जि.नागपूर) येथील रिक्षा

अपघातामध्ये १४ जणांचा झालेला मृत्यू" श्री.हेमंत टकले व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या वेळी दिनांक २८ जुलै, २०११ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती, सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**नऊ : म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

# - मध्यंतर -

**दहा : शासकीय विधेयके -**

**(अ) विचार पुढे सुरू, खंडशः विचार व संमत करणे -**

सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३.

**(क) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सद्य अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सद्य अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे -**

सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३.

**(क) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४७

सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रामदास कदम वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**अकरा : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये - (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) श्री.जयवंतराव जाधव, व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यामध्ये महिलांसाठी स्वच्छ, किमान सोयींनीयुक्त, पुरेशी व वापरण्यायोग्य स्वच्छतागृह नसल्याने महिलांची होत असलेली कुचंबना व त्यामुळे महिलांमध्ये मुत्राशयाच्या आजारांची होत असलेली लक्षणीय वाढ, राज्यातील पुणे व नागपूर या शहरांमध्ये महिला संघटना व महिला स्वयंसेवी संस्थांनी अलीकडेच आवाज उठवून दिनांक ७ मार्च, २०१२ रोजी नागपूर येथे महिलांनी 'ऑक्युपाय मेन्स टॉयलेट' अशाप्रकारे अभिनव आंदोलन करणे, महिला स्वच्छतागृहांच्या समस्येवर संवेदनशीलता व तत्परता दाखवून ही समस्या दुर करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री.संदिप बाजोरिया व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"यवतमाळ जिल्हा डोंगराळ असून शेतकरी कुटुंबाना शेतात आणि जंगलात जावे लागत असणे, शेतात झाडीझुडी जास्त असल्याने सर्पदंश होवून शेतकरी कुटुंबाचा मृत्यु

होण्याची शक्यता असणे, मात्र वसंतराव नाईक रुग्णालयात औषधाचा सातत्याने तुटवडा असणे, सदर रुग्णालयात पुरेशा प्रमाणात सर्पदंश लसीचा पुरवठा नियमित करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १० एप्रिल, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.